## प्रेसनोट दि. २०.०५.२०२१

श्री. अरूण योगीनाथ कुशीरे वय ५७ वर्ष कनिष्ट सहायक बांधकाम विभाग जिल्हा परिषद सांगली रा. मु.पो. उरूणवाडी इस्लामपूर जि. सांगली यांना २५०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

यातील तक्रारदार यांनी केलेल्या कामाचे देयक रक्कम तक्रारदार यांचे खात्यावर जमा करणेकरीता व कामाचे डिपॉझीट परत करणेकरीता श्री. कुशिरे, लिपीक, जिल्हा परीषद बांधकाम विभाग सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ३५०००/- रु रूपये लचेची मागणी केली असले बाबत दि. २०.०५.२०२१ रोजी तक्रारदार यांनी लाच मागणीची तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २०.०५.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री. कुशिरे, लिपीक, जिल्हा परीषद, बांधकाम विभाग, सांगली यांनी २५ हजार रुपयाची लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि. २०.०५.२०२१ रोजी जिल्हा परीषद, बांधकाम विभाग, सांगली येथे सापळा लावला असता श्री. अरूण योगीनाथ कुशिरे, वय ५७ वर्षे, व्यवसाय-नोकरी, कनिष्ठ सहाय्यक, बांधकाम, जिल्हा परिषद सांगली, रा. मु. पो. उरूणवाडी, इस्लामपुर, ता. वाळवा जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून २५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री. अरूण योगीनाथ कुशिरे, वय ५७ वर्षे, व्यवसाय-नोकरी, कनिष्ठ सहाय्यक, बांधकाम, जिल्हा परिषद सांगली, रा. मु. पो. उरूणवाडी, इस्लामपुर, ता. वाळवा जि. सांगली यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री सुहास नाडगौडा सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे सो पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली पोलीस निरीक्षक गुरुदत्त मोरे तसेच पोलीस अंमलदार पोकॉ अविनाश सागर, सपोफौ धुमाळ, पोहवा. भास्कर भोरे, पोहवा.संजय कलकुटगी पोहवा.सलीम मकानदार, मपोना राधीका माने व सीमा माने यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in